बेस्ट उपक्रमाच्या विद्युत पुरवठा शाखेमधील ‘परिविक्षाधीन अभियंता’ व वरिष्ठ वृत्तीधारी शिकाऊ उमेदवार पदे भरण्यासाठी अनुक्रमे विद्युत अभियांत्रिकी पदवीधर आणि पदविकाधारक उमेदवारांची आवश्यकता आहे.

मुंबई शहरातील विद्युत शक्ती वितरणाच्या क्षेत्रामध्ये गुणवत्ता व सेवा ही बेस्टची प्रदिर्घ परंपरा आहे. विद्युत पुरवठयातील कार्यक्षमता व विश्वासनियता या करीता बेस्ट उपक्रम प्रख्यात आहे.परंपरा राखण्याच्या या कार्यामध्ये स्वत: समर्पण वृत्तीने काम करण्यास इच्छुक असलेले होतकरू तरूण पदवीधर व पदविकाधारक यांची आम्ही प्रतिक्षा करीत आहोत.

| | परिविक्षाधीन अभियंता | वरिष्ठ वृत्तीधारी शिकाऊ उमेदवार |
|---|---|---|
| **आवश्यकता:-** | | |
| १.शैक्षणिक अर्हता: | सांविधिक विद्यापिठ /संस्था यांची विद्युत अभियांत्रिकी मधील पदवी किंवा तिच्या समकक्ष | सांविधिक विद्यापिठ /संस्था यांची विद्युत अभियांत्रिकी मधील पदविका किंवा तिच्या समकक्ष |

वरील पदांसाठी, पदवी /पदविका अभ्यासक्रमाच्या मागिल सर्व वर्षाच्या सत्र परीक्षा उत्तीर्ण झालेले व अंतिम वर्ष सत्र परीक्षेसाठी बसलेले व निकालाच्या प्रतिक्षेत असलेले उमेदवार अर्ज करू शकतात. परंतु असे उमेदवार जर सदर उल्लेखलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झाले, तरच त्यांचा नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल. संगणकीय ज्ञान असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| २.आवश्यकता: | अजा- ४, अज- ११, भ.ज.(ब)-३, भ.ज.(क)-३, इ.मा.व.-६, आ.दु.घ.-११, सा.शै. मा.व.-११, अराखीव-६ | अज- १८, वि.जा.(अ)-२, भ.ज.(ड)-२, इ.मा.व.-९, आ.दु.घ.-११, सा.शै. मा.व.-११,अराखीव-२२ |
| ३.जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र : | अजा, अज, भ.ज.(ब),भ.ज.(क), इ.मा.व., आ.दु.घ., सा.शै. मा.व. करीता आवश्यक | अज, भ.ज.(ब), वि.जा.(अ), भ.ज.(ड), इ.मा.व., आ.दु.घ., सा.शै. मा.व., करीता आवश्यक |
| ४.उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र: | इ.मा.व., भ.ज.(ब), भ.ज.(क), आ.दु.घ. व सा.शै.मा.व. प्रवर्गासाठी आवश्यक | वि.जा.(अ), भ.ज.(ड), इ.मा.व., आ.दु.घ., सा.शै. मा.व. प्रवर्गासाठी आवश्यक |
| ५.अधिवास प्रमाणपत्र: | आवश्यक (महाराष्ट्र राज्यातील जिल्हा कार्यकारी दंडाधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र) | आवश्यक (महाराष्ट्र राज्यातील जिल्हा कार्यकारी दंडाधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र) |
| ६.मराठीचे ज्ञान: | आवश्यक, उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा. | आवश्यक, उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा. |

| | | |
|---|---|---|
| ७.वय: | दि.०१.१०.२०२४ रोजी ३८ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये. | दि.०१.१०.२०२४ रोजी ३८ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये. |
| | (अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व., आ.दु.घ व सा.शै.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षानी शिथिलक्षम) | |
| ८.प्रशिक्षण काळातील वेतन: | अंदाजे रू.१६०००/- प्रति महिना आणि उपक्रमाच्या बसेस मधुन मोफत प्रवास | अंदाजे रू.१३०००/- प्रति महिना आणि उपक्रमाच्या बसेस मधुन मोफत प्रवास |
| ९.सुरक्षा ठेव: | नियुक्तींच्या वेळी निवड झालेल्या उमेदवारांनी ५ वर्षाच्या किमान कालावधीच्या सेवेकरीता सुरक्षा ठेव म्हणुन रू.५०,०००/- जमा करणे आवश्यक आहे. | नियुक्तींच्या वेळी निवड झालेल्या उमेदवारांनी ५ वर्षाच्या किमान कालावधीच्या सेवेकरीता सुरक्षा ठेव म्हणुन रू.५०,०००/- जमा करणे आवश्यक आहे. |
| १०.प्रशिक्षण कालावधी: | एक वर्ष | एक वर्ष |
| ११.सेवेचे कंत्राट: | पाच वर्षे | पाच वर्षे |
| १२.कामाचे स्वरूप: | बाहय स्वरूपी. उमेदवारांना पाळयांमध्ये काम करावे लागेल. | बाहय स्वरूपी. उमेदवारांना पाळयांमध्ये काम करावे लागेल. |
| १३. संपर्क तपशील: | उमेदवारांनी त्यांचा ई-मेल आय.डी. आणि मोबाईल नंबर अर्जावर नमुद करणे तसेच सदर ई-मेल आय.डी. व मोबाईल नंबर भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कार्यरत ठेवणे अनिवार्य आहे. भरती प्रक्रियेबाबतचा सर्व पत्रव्यवहार ई-मेल मार्फतच केला जाईल याची नोंद घ्यावी. | |
| १४.संभाव्य लाभ: | परिविक्षाधीन अभियंता या पदावर एक वर्ष समाधानकारक प्रशिक्षण घेतल्यानंतर उपक्रमामध्ये रिक्त असणाऱ्या उप-अभियंता या पदावर सदर उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल.(रिक्त पदांच्या उपलब्धतेवर अवलंबुन)<br>मुळ वेतन रू.३४,२००/- + महागाई भत्ता+ घरभाडे भत्ता + विशेष भत्ता + वैद्यकिय भत्ता + प्रवास भत्ता +दुरध्वनी भरपाई+ वेतनेतर लाभ जसे कि अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी + उपदान+ मंजुर झाल्यास बोनसऐवजी सानुग्रह अनुदान + | वरिष्ठ वृत्तीधारी शिकाऊ उमेदवार या पदावर एक वर्ष समाधानकारक प्रशिक्षण घेतल्यानंतर उपक्रमामध्ये रिक्त असणाऱ्या प्रभारी अभियंता या पदावर सदर उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल. (रिक्त पदांच्या उपलब्धतेवर अवलंबुन)<br>मुळ वेतन रू.३०,५००/- + महागाई भत्ता+ घरभाडे भत्ता + विशेष भत्ता + वैद्यकिय भत्ता + प्रवास भत्ता +दुरध्वनी भरपाई+ वेतनेतर लाभ जसे कि अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी + उपदान+ मंजुर झाल्यास |

| | | |
|---|---|---|
| | रजा प्रवास सहाय्य + उपक्रमाच्या बसेस मधुन मोफत प्रवास सुविधा आणि मोफत वैद्यकिय सुविधा,इ.) | बोनसऐवजी सानुग्रह अनुदान + रजा प्रवास सहाय्य + उपक्रमाच्या बसेस मधुन मोफत प्रवास सुविधा आणि मोफत वैद्यकिय सुविधा,इ.) |

१. भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

२. अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती (ब, क आणि ड) विशेष मागासप्रवर्ग, इतर मागासवर्ग, आर्थिक दृष्टया दुर्बल घटक आणि सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग यांच्याकरीता पदांचे आरक्षण महाराष्ट्र शासनाने निर्धारित केलेल्या टक्केवारीप्रमाणे राहील.

परिविक्षाधीन अभियंता व वरिष्ठ वृत्तीधारी शिकाऊ उमेदवार यांच्या पदांकरिता आवश्यक अर्हताधारण करणाऱ्या उमेदवारांनी शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवस वगळुन साप्ताहिक दिनी सकाळी ९.३० ते दुपारी १२.३० आणि १.३० ते ३.०० या वेळेत कोष विभाग, बेस्ट उपक्रम, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१ यांच्या कार्यालयात रू१०/- च्या प्रदानावर विहीत प्रपत्र उपलब्ध आहेत. उमेदवारांनी सदर विहित प्रपत्रामध्ये अर्ज करणे अनिवार्य आहे.

वय, अर्हता यांच्या समर्थनार्थ प्रमाणपत्रे / कागदपत्रे, जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र इ. च्या स्वयंसाक्षांकित छायाप्रतींसोबत विहित प्रपत्रामध्ये यथोचितरित्या भरलेला आणि बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (B.E.S&T Undertaking) यांच्या नावे काढलेल्या ना परतावा रू.३००/- (राखीव प्रवर्गातील उमेंदवारांच्या बाबतीत रू.१५०/-) चा रोखीत डिमांड ड्राफ्ट जोडलेला अर्ज दि. ०७/१०/२०२४ पासुन २५/१०/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत हस्तेपोच किंवा टपालाव्दारे खालील पत्यावर पोहोचला पाहिजे. नियोजित तारखेच्या नंतर कोणत्याही कारणाने उशीरा आलेले अर्ज व अपुर्ण भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**विभागीय अभियंता**
प्रशिक्षण व औद्योगिक अभियांत्रिकी विभाग
तिसरा मजला, क्लब रोड बिल्डिंग, बेस्ट मुबई सेन्ट्रल आगार,
मराठा मंदिर मार्ग, मुबई सेन्ट्रल, मुंबई ४०० ००८

महाव्यवस्थापक